महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

---

क्र. संकीर्ण-२०२५/ई-१४५९३६४/विशि-४ दिनांक :- ८ जुलै, २०२६.

प्रति,

सचिव,
महाराष्ट्र विधानसभा,
विधान मंडळ सचिवालय,
विधानभवन, मुंबई.

विषय :- अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे या विद्यापीठाचे सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ या वर्षांचे वार्षिक अहवाल विधानमंडळाच्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०२३ मधील कलम ४९ (३) मधील तरतूदीनुसार विद्यापीठाचे वार्षिक अहवाल राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवावयाचे आहेत. सदर अधिनियमाची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुषंगाने अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ या वर्षांचे वार्षिक अहवाल सन २०२६ च्या पावसाळी अधिवेशनाच्या वेळी विधानसभेच्या पटलावर सादर करावयाचे आहेत. सदर वार्षिक अहवाल विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यास अनुमती देण्याची विनंती मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या पत्राव्दारे मा. विधानसभा अध्यक्ष यांना करण्यात आली आहे. (सुलभ संदर्भासाठी प्रत सोबत जोडली आहे.)

२. संसदीय कार्य विभागाच्या दि. २३/०९/२०१५ च्या शासन परिपत्रकानुसार वार्षिक अहवाल महाराष्ट्र विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याकरिता सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ या वर्षाचे वार्षिक अहवाल विधान सभेच्या पटलावर ठेवण्यासाठी वार्षिक अहवालांच्या

पेनड्राइव्ह च्या स्वरुपात १ प्रत तसेच (मराठी व इंग्रजी) पुस्तक रुपाने प्रत्येकी १० प्रती यासोबत पाठविण्यात येत आहेत.

३. अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे या विद्यापीठाचे सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांसाठीचे वार्षिक अहवाल प्राप्त झाले आहेत. विद्यापीठाने भाषांतर आणि अहवालातील त्रुटी दूर करण्यासाठी अहवाल सादर करण्यास विलंब झाला असल्याचे कळविले आहे.

४. आपणास विनंती करण्यात येते की, त्यानुषंगाने अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ या कालावधीचे वार्षिक अहवाल महाराष्ट्र विधानसभा सभागृहाच्या पटलावर ठेवण्याची कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

(प्रताप पां. लुबाळ)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र:-वरीलप्रमाणे